MHKO100002402014

**नियमीत दिवाणी दावा क्र. ९७/२०१४**

शिवाजी देसाई वगैरे
/वि/
यशवंत देसाई वगैरे

**निशाणी क्र. ६९ वर आदेश**

वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.५ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला उशिर माफ होणेसाठी व दावावसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द होऊन मिळणेसाठी विनंती केलेली आहे. प्रतिवादींतर्फे अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शणास येत आहे की, प्रतिवादी क्र.५ वसंत शंकर देसाई हे दिनांक ११/०७/२०२० रोजी मयत झालेले आहेत व प्रस्तुतचा अर्ज हा दिनांक १५/१२/२०२३ रोजी दाखल केलेला आहे. मुदतीचे अधिनियम १९६३ चे आर्टीकल १२० प्रमाणे वादीने, प्रतिवादीच्या मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांमध्ये वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. तसेच, मुदतीत वारस अभिलेखावर न घेतल्यास आदेश २२, नियम ४ प्रमाणे तो दावा मयत प्रतिवादीविरुध्द दावा अवसान (Abate) होतो. आदेश २२, नियम ४ (५) (ब) प्रमाणे वादी उशिराबाबत संयुक्त कारण दाखवत असेल तर न्यायालयाला विलंब माफ करुन वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देता येईल.

०३. त्याप्रमाणे प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, वादी यांना बराच विलंब झालेला आहे. त्याबाबत वादी यांनी मुदतीचे अधिनियम १९६३ चे कलम ५ प्रमाणे संयुक्त कारण दिलेले आहे का हे पाहणे गरजेचे आहे. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी हे मयत झालेनंतर काही दिवसांतच कोरोना-१९ या संसर्गजन्य विषाणूच्या वाढत्या प्रादूर्भावामुळे न्यायालयीन कामकाज बंद असलेने तसेच पक्षकारांना न्यायालयीन कामकाजामध्ये प्रत्यक्ष हजर राहता येत नव्हते. तसेच, वादी क्र.४ हया मयत असून वादी क्र.५ हया महिला असून राहणेस आपल्या सासरी असतात. तसेच, वादी क्र.१ व २ तर्फे वटमुखत्यार म्हणून वादी क्र.३ हे सदर वादेचे काम पाहत होते, परंतु ते देखील दिनांक

२३/०९/२०२३ रोजी मयत झाले. तसेच, मयत प्रतिवादी यांच्या वारसांची नांवे व पत्ते वादी यांना माहिती नसलेमुळे त्यांना सदरची नांवे व पत्ते मिळविण्यास काही कालावधी लागलेला आहे. त्यामुळे, त्यांना वारस अभिलेखावर आणणेसाठी विलंब झालेला आहे असे कारण नमुद केलेले आहे. सदर कारण व विलंबाचा काळ पाहता वादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण हे संयुक्तीक होत नाही. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता प्रकरणाची गुणदोषावर निर्गती करण्याकरीता प्रतिवादी क्र.५ यांचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. त्यामुळे, त्यांना अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करणे व अबेटमेंटचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत वादी यांचेवर अर्जाचा खर्च ठेवून त्याची भरपाई प्रतिवादी यांना देणे योग्य होईल. सबब, मी पुढील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

०१. अर्ज रक्कम रु.१,०००/- (रुपये एक हजार फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहेत.

०२. प्रतिवादी क्र.५ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द करण्यात येत आहे.

( खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला )

सही/-

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः २९/०१/२०२४.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 29/01/2024 |
| Order signed by P.O. on | 29/01/2024 |
| Order uploaded on | 29/01/2024 |